# ऑनलाइन साहित्य संमेलनात मुळे, सातोस्कर यांना पुरस्कार

**पुणे, ता. १७ :** संगणकाद्वारा घेतलेल्या पहिल्या बुकगंगा 'ऑनलाइन विश्वसाहित्य संमेलना'त जगभरातून ८० हजार वाचकांनी हजेरी लावल्याचा दावा संयोजक मंदार जोगळेकर यांनी आज पत्रकार परिषदेत केला. या संमेलनाच्या निमित्ताने वाचकांनी निवडलेल्या विविध गटांतील सहा जणांना पुरस्कार देण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.

विश्व साहित्य संमेलन या संकेतस्थळावर पाच ते पंधरा सप्टेंबर या कालावधीत 'ऑनलाइन' साहित्य संमेलन घेण्यात आले. पुढील ५० वर्षांत मराठी भाषेचे स्थान काय असेल, तसेच वाचनसंस्कृती, मराठी भाषेचे राजकारण आणि समाजकारण या विषयांवर चर्चासत्रे झाली. त्यात अमेरिका, कॅनडा, युरोप, दुबई, सिंगापूर, ऑस्ट्रेलिया आदी देशांतील मराठी वाचकांनी सहभाग घेतला, असे जोगळेकर यांनी सांगितले. या वेळी धनंजय दातार उपस्थित होते.

साहित्यिक शंकर सारडा यांच्या हस्ते या संमेलनाचे उद्‌घाटन झाले होते. यामध्ये आठशे कविता सादर करण्यात आल्या, अडीचशे वाचकांनी आवडत्या पुस्तकांची आणि साडेतीनशे लेखकांची नावे नोंदविली. विशेष म्हणजे संगणकावर मजकूर टाकताना बहुतांश जणांनी मराठी 'फॉन्ट'चा वापर केला, असे जोगळेकर म्हणाले. सुहास मुळे यांना 'आवडता लेखक', कवयित्री बीना सातोस्कर यांना 'आवडती कविता', अनमोल प्रकाशन यांना 'आवडता प्रकाशक', प्रशांत रेडकर यांना 'आवडता ब्लॉगर', तर अमोल तावरे यांना 'चोखंदळ वाचक' पुरस्कार जाहीर करण्यात आला. या सर्वांना प्रत्येकी दहा हजार एक रुपये देण्यात येणार असून, ते त्यांच्या बँक खात्यावर जमा केले जातील, असे जोगळेकर यांनी सांगितले.